गोदातीर दिनांक :- 15/07/21

# नांदेड परिक्षेत्रात वाहन तपासणी मोहिमेअंतर्गत ३१ लाखांचा दंड वसूल

**नांदेड-** नांदेड परिक्षेत्रातील वाहन चोरीच्या गुन्ह्यावर आळा घालण्यासाठी पोलीस उपमहानिरीक्षक निसार तांबोळी यांनी सर्व पोलीस अधीक्षक यांची बैठक घेऊन नऊ जुलैपासून विशेष मोहीम सुरु केली आहे. दि. ९ जुलै रोजी अवैध धंदे मोडीत काढण्यासाठी राबविण्यात आलेल्या विशेष मोहिमेत ३७० गुन्ह्यांमध्ये ४८५ आरोपींविरुद्ध कारवाई केली. त्यांच्याकडून ३६ लाख ५३ हजार ४४ रुपयांचा मुद्देमाल जप्त केला होता.

त्यानंतर दि. १० जुलै रोजी परिक्षेत्रातील १२५ पोलीस अधिकारी व ४९७ पोलीस अंमलदार यांनी गुन्हेगारीवर आळा घालण्यासाठी ऑल ऑऊट ऑपरेशन राबवून ८८१ आरोपीतांची घर झडती घेऊन त्यांचा शोध घेतला. २८३ आरोपींवर प्रतिबंधात्मक व आर्म ॲक्टनुसार कारवाई करून अग्नीशास्त्र व तलवारीसह इत्यादी शस्त्रे जप्त करण्यात आली. दि. १२ व १३ जुलै रोजी परिक्षेत्रातील नांदेड, हिंगोली, परभणी आणि लातूर या जिल्ह्यांमध्ये वाहन तपासणी विशेष मोहीम राबविण्यात आली. यात २२ हजार ११३ वाहनांची तपासणी करुन त्यापैकी ९ हजार ९१ वाहनांवर मोटार वाहन कायद्यांतर्गत कारवाई करण्यात आली. त्यातील ४१ वाहन प्रकरणे आरटीओकडे कारवाई करण्यासाठी पाठविण्यात आली असून, चार वाहने चोरीची आढळली आहेत. याप्रकरणी एकूण ३१ लाख १२ हजार आठशे ९९ रुपयांचा दंड वसूल करण्यात आला आहे. सदरची कारवाई पोलीस उपमहानिरीक्षक निसार तांबोळी यांच्या मार्गदर्शनाखाली नांदेडचे पोलीस अधीक्षक प्रमोदकुमार शेवाळे, लातूरचे पोलीस अधीक्षक निखिल पिंगळे, परभणीचे पोलीस अधीक्षक जयंत मीना, हिंगोलीचे पोलीस अधीक्षक राकेश कलासागर यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांच्या अधिनस्त अधिकारी व कर्मचाऱ्यांनी राबविली आहे. यापुढेही अवैध धंदे गुन्हेगारांवर वचक व वाहनचोरीवर आळा घालण्यासाठी विशेष मोहीम सुरुच राहणार असल्याचे तांबोळी यांनी सांगितले.

